# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्र. ५०

क्र.झोपुप्रा/विनि/अने.३/२००१/१५७५
दिनांक : १८/०६/२००१

**विषय : जोडपत्र ३ च्या मंजूरीबाबत.**

विकासक /वास्तुविशारद हे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत या कार्यालयाच्या अभियांत्रिकी विभागामार्फत जोडपत्र –३ च्या मंजुरीसाठी वित्त नियंत्रकांकडे प्रस्ताव सादर करतात. अशा प्रस्तावांची छाननी करतांना खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१) जोडपत्र – ३ पूर्णपणे व योग्य रितीने भरलेले नसते. सोयीसाठी नाही/हो यापैकी एक खोडण्याची तसदी सुध्दा संबधित विकासक घेताना दिसत नाहीत.

२) जोडपत्र – २ प्रमाणे किती झोपडयांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव आहे हे स्पष्ट लिहीलेले नसते.

३) आर्थिक क्षमता सिध्द होण्यासाठी आवश्यक असलेल्या २०% रक्कमेचा उल्लेख नसतो आणि ८०% रक्कम कशी उभारणार हे सुध्दा लिहीलेले नसते.

४) जोडपत्र – ३ विकासक/ वास्तुविशारद यांनी स्वाक्षरीत केलेले नसते.

५) आयकर विवरणपत्रे /ताळेबंद जोडले आहेत असे जोडपत्र – ३ मध्ये नमूद केलेले असते तथापि प्रत्यक्षात कागदपत्रे जोडलेलीच नसतात किंवा जुनी असतात.

६) विकासक /वास्तुविशारद यांचा पूर्ण पत्ता लिहीलेला नसतो. फर्मचे स्वरूप कित्येकदा विसंगत असते.

७) प्रस्तावासोबत जोडपत्र – ३ सादरच केलेले नसते.

८) जोडपत्र – ३ अभियांत्रिकी विभागामार्फत सादर केलेले नसते.

उपरोक्त प्रकारच्या त्रुटींमुळे या कार्यालयाचा नाहक पत्रव्यवहारात अमूल्य वेळ व स्टेशनरी,पोस्टेज इ.चा अनावश्यक खर्च होतो. त्यामुळे जोडपत्र – ३ सादर न करणे, ते विकासक/वास्तुविशारद यांनी स्वाक्षरीत न करणे आणि जोडपत्र – ३ मधील माहिती पूर्ण न लिहिणे अशा प्राथमिक स्वरूपाच्या उणीवा आढळून आल्यास अशा प्रकरणांची तांत्रिक छाननी तात्काळ थांबविण्यात येईल याची सर्व संबधित वास्तुविशारद व विकासकांनी नोंद घ्यावी.

सही/-
**वित्त नियंत्रक**

प्रत :

१) उप संचालक नगर रचना, (झो.पु.प्रा.),

२) कार्यकारी अभियंता १,२,३,४ , (झो.पु.प्रा.),

३) लेखा अधिकारी,

४) अभियांत्रिकी विभाग,

५) स्लम रिडेव्हलपर्स असोसिएशन ,

६) Practising Engineers Architects & Town Planners Association ,

७) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक,

सचिव यांचे स्वीय सहाय्यक ,